म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६८



# मगध आणि नंतरच्या कविता

श्रीकांत वर्मा

REFBK-0025625
REFBK-0025625

REFBK-0025625
REFBK-0025625
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

स्वर्गीय श्रीकांत वर्मा

# मगध
# आणि
# नंतरच्या कविता

मराठी अनुवाद : चंद्रकान्त पाटील

आंबेडकर प्रबोधिनी

मराठी अनुवाद : १९८७
© श्रीमती वीणा वर्मा, नवी दिल्ली/चंद्रकान्त पाटील,
औरंगाबाद

प्रकाशक :
नामदेव ढसाळ
आंबेडकर प्रबोधिनी
९४, हाजी कासम चाळ
शाहीर अमरशेख मार्ग
जेकब सर्कल
मुंबई-४०० ०११

**मुखपृष्ठ : नामदेव ढसाळ**

मुद्रक : श्रीरंग प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड
बी/४, श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट, जी.डी. आंबेकर मार्ग,
वडाळा मुंबई ४०० ०३१.

Magadh Aani Nantarchya Kawita
Poems (Hindi) by Late Shrikant Varma
Marathi Translation: Chandrakant Patil

**मूल्य : २५/-**

निर्मल वर्मासाठी

हा अनुवाद
योहुल
आशुतोष
अभिषेक
आणि जनमेजय यांच्यासाठी

—चंद्रकान्त

अनुक्रम :

१. स्मृतिलेख : वेदनेतून उमललेलं काव्य
'मगध'मधील कविता (१९७९, १९८४)

१–नांदी
२–मगध
३–मगधचे लोक
४–काशीतलं प्रेत
५–काशीचा न्याय
६–कोसंबी
७–हस्तिनापुर
८–हस्तिनापुरची रीत
९–कपिलवस्तू
१०–किंचाळत कपिलवस्तू
११–तक्षशिला
१२–उज्जैनी
१३–उज्जैनीचा रस्ता
१४–अवंतीत अनामिक
१५–अफवा
१६–दुसरीच एखादी अमरावती
१७–नालंदा
१८–मिथिला का नाही
१९–मथुरेचा शोक
२०–वैशाली-१
२१–वैशाली-२
२२–कोसल गणराज्य
२३–कोसलमधे विचारांची उणीव आहे
२४–कोसलची शैली
२५–श्रावस्ती
२६–लिच्छवी
२७–वसंतसेना
२८–अंबपाली

२९६२५
५६६५८

२९–अश्वारोही
३०–हादरा
३१–येरझारा
३२–मित्रांचे प्रश्न
३३–छाया
३४–हवन
३५–बुद्धकालीन गणिकेचा स्वप्नभंग
३६–कृपा आहे महाकालाची
३७–मूळ
३८–अंत:पुरात शोक
३९–जो तरुण होता
४०–मणिकर्णिकेचा डोंब
४१–धर्मयुद्ध
४२–उद्दिष्ट : चंपा
४३–कनोजला जाणाऱ्यांची गणना
४४–नियम
४५–पाटलिपुत्र
४६–कवितेचा वाढदिवस
४७–हस्तक्षेप
४८–सद्गती
४९–शकटार
५०–तिसरा रस्ता
५१–मायामृग
५२–पुरावा
५३–परती
५४–सामना
५५–रोहिताश्व
५६–भिंतीवर नाव

'मगध' नंतरच्या असंकलित कविता
(१९८४, १९८५, १९८६)

१ गरुड
२–पितामह
३–जादूटोणा
४–मगधमधे स्मशानशांतता
५–गांधार
६–काशीचे पंडित
७–अश्वत्थामा
८–तक्षशिला
९–आता मगध असणार नाही
१०–शिव जे आठवतात आणि शिव जे आठवत नाहीत
११–गंगा : आठवणीचा पर्याय
१२–विदेह
१३–विश्वघोष
१४–मणिकर्णिकेखाली मणिकर्णिकाच सापडेल

भूमिका : ८ जून १९८६

# वेदनेतून उमललेले काव्य

श्रीकांत वर्माच्या दुःखद निधनाला आता आठवडा होत आलाय्. जवळजवळ दोन-अडीच महिने हा माणूस दिल्लीपासून, घरादारापासून, बायको-मुलांपासून हजारो मैल दूर एका इस्पितळात कर्करोगाशी झगडत होता. मरणाच्या सीमेवर जगण्यासाठी संघर्ष करीत होता. अधूनमधून वर्तमानपत्रात बातमी यायची बाकी कळायला काही मार्ग नव्हता.

आता नीट आठवत नाही, फेब्रुवारीच्या अखेरीस किंवा मार्चच्या सुरुवातीस श्रीकांतजींचं पत्र होतं : अचानक मुंबईत येतोय्. आठ दिवसांसाठी. मुक्काम कुठं ते माहीत नाहीये. तिथं गेल्यावरच कळेल. जमल्यास मुंबईत संपर्क साधा— अशा अर्थाचं पत्र. मुंबईत अनेक ठिकाणी फोन लावले. ठावठिकाणा लागला नाही. मग सोडून दिलं. पत्र टाकायचं ठरवलं नंतर दिल्लीत. ते डोक्यात होतंच तोपर्यंत वर्तमानपत्रात बातमी आली—श्रीकांत वर्मांना कर्करोग झाल्याची. शिवाय लगेच न्यूयॉर्कला जाणार उपचारासाठी असंही. वाईट वाटलं. पत्र राहूनच गेलं. अधूनमधून काळजी वाटायची की काय झालं असेल. पुन्हा कधीतरी बातमी असायची. तीन शस्त्रक्रिया झाल्याचं कळलं. प्रकृती सुधारतेय्. मग अचानक प्रकृती गंभीर. मग बरेच दिवस काहीच नाही. बारा मेला उज्जैनला होतो. तिथं सुदीप बॅनर्जीची बऱ्याच दिवसांनी भेट झाली. पंजाबहून परतल्यावर पहिल्यांदाच. पंजाबचा विषय निघाला. लगेच श्रीकांतजींची आठवण. सुदीपला विचारलं, कळलं का काही श्रीकांतजींबद्दल, काही नाही, सुदीपनं सांगितलं. आणि मग असंहि की अशोक वाजपेयी अमेरिकेत गेलेत, ते आल्यावर कळेल सविस्तर. आणि मग पंधरा दिवसांच्या आतच कळलं हे. फारच वाईट वाटलं. तो आठवडाच असा वाईट गेला. सगळ्या अशाच बातम्या. जवळची, ओळखीची, माहितीतली। लोकं जातायत; आणि बाहेर खिन्न हवा. बाहेर भरून आलेलं आभाळ, आणि आत आत रितेपणाचं ओझं वाटायचं. गावात दंगलही चालूच असायची.

श्रीकांत वर्मा काही फार जवळचा माणूस नव्हता. त्यांच्या अलीकडच्या कवितांमुळे मात्र फार जवळीक वाटायची. १९८४ च्या फेब्रुवारीत भारत भवन (भोपाळ) मधे कवितेचा एक अभूतपूर्व उत्सव झाला होता. त्यात मुकुटधर पांडचे या ८६ वर्षांच्या कविंपासून महादेवी वर्मासकट सुमारे ७५-८० महत्त्वाचे कवी होते. दिवसा कवितेवर चर्चा आणि रात्री काव्यवाचन चालायचं. श्रीकांत वर्मा पहिल्यांदा तिथंच भेटले. आणखीहि अनेकजण पहिल्यांदा भेटत होते–शमशेरबहादुर सिंह, रघुवीर सहाय, केदार नाथ सिंह. पहिलंच सत्र त्यांच्या अध्यक्षतेखाली. पण संध्याकाळी त्यांनी नव्या कविता वाचल्या. शांत, गंभीर, खोल आवाजात. आणि त्या सगळ्याच कविता एकदम वेगळ्या वाटल्या. मग त्यांनीच सांगितलं की, 'मगध' या आगामी संग्रहात त्या येतायत. पुढे 'मगध' आलं, आणि विलक्षण काहीतरी वाचल्याचं जाणवत राहिलं. आस्था वाढत गेली. 'मगध'बद्दल त्यांनी जे पत्र लिहिलं होतं ते आता आठवतंय, २९ मे ८५ चं पत्रं. 'मगध' त्यांच्या मते त्यांचं सर्वात चांगलं पुस्तक. गेल्या पाचसात वर्षांतलं चिंतन त्यात नीटपणे अभिव्यक्त करायचा प्रयत्न केलाय. आणि 'मगध'चा मराठी अनुवाद पुस्तकरूपानं प्रकाशित व्हावा अशी तीव्र इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. माझ्याकडून ते राहूनच गेलं, याची खोलवर खंत वाटतेय आता. त्यांचं आणखी एक पत्र सारखं आठवतंय. २२ नोव्हेंबर ८५ चं. त्यात पक्षाच्या कामातून मुक्त झाल्यानंतरच्या संमिश्र भावना होत्या. शिवाय आता वेळच वेळ आहे. पूर्ण वेळ लेखन करायचं. खूप काही लिहायचयं, लिहिण्यासारखं बरंचसं आहे, निवांतपणाही मिळेलच. आणखीही बरंच होतं. एका मित्रासाठी त्यांनी उर्दू अनुवादाची संमतीही पाठवली होती. 'मगध' नंतर सृजनासाठी त्यांना बराच उत्साह आला असावा. पण नोव्हेंबर उलटून तीन महिनेही झाले नाहीत, आणि कर्करोगाच्या विळख्यात जखडावं लागलं. सृजनाचं काहीच झालं नाही, मरणाच्या सार्वभौम साम्राज्यात विलीन व्हावं लागलं, हे भलतच ॲब्सर्ड होतं. भलत्याच वाटेचा प्रवास. फार वर्षांपूर्वी त्यांनीच लिहिलं होतं, ''बुखार में कविता''तः 'लेकिन एक बार उड जाने के बाद। इच्छाएँ। लौट कैर नहीं आती। किसी और जगहपर। घोंसले बनाती है.' रिकामं घरटं फांदीवर झुलत रहावं तसा हा अनुभव होता. त्यांच्या नसण्याचा हा प्रवास त्यांनाही अनपेक्षित असावा. नाहीतर मुंबईला आठ दिवस कशासाठीं जातोय हे पत्रात तर नक्कीच लिहिलं असतं त्यांनी.

## गतिमान आयुष्य

हा माणूस विलक्षण गतिमान आयुष्य जगला. सतत स्वतःला गुंतवत गेला, कितीतरी साहित्यिक-सांस्कृतिक-राजकीय चळवळींत, कितीतरी आंदोलनांत. अनेक संघर्ष केले, होत गेले. स्वतःशीच लढे पुकारावे लागले. द्वंदांतून, संघर्षांतून एकेक पाऊल ठामपणे उचलत राहिला. बाहेरच्या जगातली सगळी आव्हानं स्वीकारत चालत राहिला. आणि या अवघड वाटचालीत सृजनाचं खडतर व्रत सांभाळीत गेला. न पेलवणारी अनेक आंतरिक वादळं पचवली, अनास्थेकडून आस्थेकडे गेला, तुटलेपणातून गुंतवून घेण्याच्या ध्रुवाकडे गेला. विद्रोहातून वाट काढत स्वीकृतीकडे गेला. 'मगध'-मधल्या कवितांना त्याच्या या जगण्याची पार्श्वभूमी आहे, आणि चिंतनाचे घट्ट पीळ 'मगध'मधल्या शब्दाशब्दांतल्या रिकाम्या जागांत संपृक्तपणे विखुरलेले आहेत. परंपरेशी विद्रोह करीतच जन्माला आलेली त्यांची कविता चिंतनाच्या अवघड वाटांनी परंपरेच्या ऐन गाभ्यातच रुतून बसली. 'मगध' हिंदीतच काय, समग्र समकालीन भारतीय कवितेत केंद्राच्या जेवळपासच असलेली कविता आहे.

## कवितेचे प्रचंड आकर्षण

मध्यप्रदेशाच्या विलासपूर इथं १९३१ च्या सप्टेंबरात जन्मलेला हा माणूस लोकजीवनाचं संपृक्त विश्व जवळून न्याहाळत असतानाच परिसरापासून दूरदूर जात राहिला. नागपूर विद्यापीठा-तून एम्.ए. केलं, आणि दिल्लीत आला तेव्हाच त्याला 'मगध'चं मायाजाल दिल्लीत जाणवलं असावं. एका बाजूनं नेमक्या भवितव्याचा अभाव, कवितेचं प्रचंड आकर्षण आणि जागरुक सामाजिक चिंतनाचा परिणाम म्हणूनच हा माणूस पत्रकारितेकडे वळला असावा. पत्रकारितेत बरीच वर्ष काढली. वाङमयीन नियतकालिकं काढली. नेटानं चालवली आणि बंद पडत गेली. ज्या वास्तवावर नेटानं प्रेम केलं त्यातली अवकळाच मनाच्या संवेदनशील पडद्यावर उमटत गेली. मोहभंगाची स्थिति अधिकच उदासीन करीत गेली. मूल्यहीनता, दांभिकपणा आणि तकलादूपणावर अलगद उभारलेल्या समाजानं मनाला आरपार तडे गेले, सतत जागरुक राहिल्यामुळे, चौकस होत गेल्यामुळे, सगळ्या गोष्टी तर्किक तराजूत तोलायची सवय लागल्यामुळे कवितेची प्रचलित भाषा अभिव्यक्तीसाठी अपुरी पडत गेली, पण जगण्याचं भान

होतंच, आणि गोष्टींतली अंतर्भूत द्वंद्वं कवितेतल्या ओळीओळींत प्रतिबिंबित होत गेली. नव्या जगण्याच्या पद्धतीला समांतर आणि नंतर जगण्याच्या पद्धतीतून सरळ उचलून घेतलेली भाषा अर्थवाही आणि प्रामाणिक होत गेली. कुशाग्र बुद्धी आणि आत्मालोचनेमुळे कवितेनं अनेक वळणं घेतली. 'भटका मेघ', 'मायादर्पण', 'दिनारंभ', 'जलसाघर' या पहिल्या चार कवितासंग्रहांत ती स्पष्टपणे दिसतात. पण 'मगध' या अगदी अलिकडच्या आणि अखेरच्या संग्रहातलं वळण मात्र फारच वेगळं आणि मौलिक होतं. या पाच कवितासंग्रहांत जवळजवळ तीस वर्षांचा कालावधी आहे. या काळात कवितेसोबतच समकालीन हिन्दी साहित्यात एकदम स्वतःचा मुखवटा असलेलं आणि कवितेपासून अगदीच भिन्न असं गद्यही लिहिलं. ते 'झाडी' आणि 'संवाद' या दोन कथासंग्रह्यांत इतकं समर्थपणे आलेलं आहे की, समकालीन कथेतही त्याची जागा निश्चित आहे, हे नामवर सिंहसारख्यांनाही मान्य करावं लागतं. या माणसानं 'दूसरी बार' नावाची एक कादंबरी लिहून फ्रेंच कादंबरीच्या 'अतिनव' लाट्टेशी नातं जोडण्याचाही प्रयत्न केला, आणि वेळोवेळी लिहिलेल्या निबंधांची 'ज़िरह' आणि 'प्रसंग' अशी दोन पुस्तकंहि नावावर आहेत. पण याशिवायही आणखी बरंचसं या माणसाजवळ होतं. तीव्र बौद्धिक जिज्ञासा, सगळ्या गोष्टी मुळापासून समजून घेण्याची प्रबळ इच्छा, ज्ञानाच्या स्थलातीत–कालातीत साम्राज्यांच्या जवळ जवळ जाण्याचा प्रयत्न करून पूर्णतेचा गाभा माहीत करून घेण्याची लालसा अशा गोष्टींनी त्याला जगभर भटकून येण्याची प्रेरणा दिली. विसाव्या शतकावर आपला दीर्घ ठसा उमटवणाऱ्या ऑक्ताविओ पाझ, नताली सारोत, ज्याँ-पॉल सार्त्र, आन्द्रे वोझ्नेसेन्स्की, हंस माग्नुस एन्झेनबर्ग, एवतुशेंको, नोअम् चॉम्स्की अशा जगभरच्या कवी-लेखक-विचारवंतांशी हा माणूस संवाद साधत गेला. त्यांच्या भेटीगाठींवर मुलाखतींवर, आठवणींवर आधारलेलं ''बीसवी शताब्दी के अँधेरे में'' हे त्याचं पुस्तक अतिशय वाचनीय आणि खोलवर विचार करायला लावणारं आहे. पहिलं प्रेम कविताच असल्यानं विदेशी भाषांमधल्या अनेक मौल्यवान कवितांची भाषांतरंही केली; आणि या माणसाच्या कवितांची इंग्रजी, डॅनिश, बल्गेरियन, जर्मन, रशियन, जपानी भाषांतरं प्रकाशित झाली. मध्यप्रदेशाच्या 'शिखर सम्मान' पासून अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार यानं थंडपणे स्वीकारले. खासदारकीपासून इंदिरा काँग्रेसच्या सरचिटणीस पदापर्यंत, काँग्रेसच्या निवडणुकांचा प्रचार विभाग संभाळण्यापर्यंत अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

श्रीकांत वर्मा यांचा कवितेतला प्रवास आणि त्यांचं व्यक्तिगत आयुष्य समांतरच होतं. निराला आणि गजानन माधव मुक्तिबोध या दोन महान कवींच्या आवर्तात श्रीकांतजी अडकले नाहीत, आणि गजानन माधव मुक्तिबोध यांच्या १९६५ च्या सुमारास प्रकाशित झालेल्या पहिल्याच ''चाँद का मुँह टेढा है'' या संग्रहाची प्रस्तावना श्रीकांत वर्मा यांनीच लिहिली होती या पार्श्वभूमीवर तर ही गोष्ट महत्त्वाचीच आहे. १९६० च्या आसपास समकालीन हिंदी कवितेला नवं वळण देणाऱ्या आणि आजतागायत महत्त्वपूर्ण कविता लिहिणाऱ्या पिढीत रघुवीर सहाय-कुँवरनारायणसोबतच श्रीकांत वर्माही आघाडीवर होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दशकात मोहभंग झालेल्या पिढीची घृणा, संताप, विद्रोह श्रीकांतजींच्या ''मायादर्पण'', ''दिनारम्भ''मधे पूर्णपणे आणि स्वतःची खास शैली घेऊन व्यक्त झालेला आहे. या काळात ते ग्रेगरी कॉर्सो-जॅक केरवा-ॲलन गिन्सबर्ग-लॉरन्स फलिंघेट्टीच्या पिढीनं निर्माण केलेल्या काव्य-विषयक दृष्टिकोणाच्या जवळपास असावेत. पण ही अराजकता हळूहळू मार्क्स आणि राममनोहर लोहियांच्या अध्ययनातून दूर होत गेली, आणि समोरच्या धगधगीत वास्तवाच्या मूलभूत आकलना-साठी जगभरच्या संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि इतिहासाच्या अध्ययनाने त्यांनी आपली काव्यविषयक भूमिका निर्माण केली. तिचा ठसा ''जलसाघर'' मधे आहे. नंतरचा एक मोठा कालखंड त्यांच्या सक्रिय राजकारणातील सहभागात गेला. विशाल भारतखंडाशी एका बाजूनं नातं जुळत गेलं, खास देशी जाणिवांचं वर्चस्व वाढत गेलं आणि याच मनोभूमीतून विद्रोहाची जागा स्वीकृतीत बदलत जाण्याचं परिवर्तन आलं. पण या स्वीकृतीत आंधळेपणा नव्हता. काळातल्या राजकीय परिवर्तनाचा, अस्थिर-तेचा, सत्तांतराचा परिणाम आणि ढासळणाऱ्या मूल्यविवेकाचा सार्वजनिक प्रभाव त्यांना आतल्याआत विलक्षण अस्वस्थ करीत होता. विसाव्या शतकाच्या काळोखाच्या रात्री जेव्हा पूर्वेकडचा प्रकाशच मार्गदर्शक ठरेल असं जगभरच्या विचारवंत, लेखक, कवींना वाटत होतं तेव्हा खुद्द इथला अंधार, सर्व पौर्वात्य संस्कृती व सभ्यतांचा अंधार अधिकच गडद असल्याची विदारक जाणीव श्रीकांत वर्मांना अस्वस्थ करीत होती. दुसऱ्या सत्तांतरानंतर सत्तेच्या परिघात, प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय संस्कृतीचं केंद्र घेऊन, अगदी केंद्राजवळ राहून त्यांनी जे अनुभवलं, पाहिलं तेच 'मगध'मधे सृजनाच्या पातळीवर गेलेलं दिसतं. त्यांनी जे चित्र रंगविलं ते आपोआपच स्थलातीत, कालातीत होत गेलं, किंवा सद्यःकालीन

वास्तवाचंच प्रतिबिंब होऊन गेलं. मगध हे फार पूर्वी, दोन हजार वर्षांपूर्वी किंवा त्याच्या आसपास नव्या बौद्धिक परिवर्तनाचं, जागरणाचं, विद्रोहाचं बौद्ध आणि जैन संप्रदायांच्या विचारसरणींचं प्रतीक होतं असं म्हणतात. त्या मगधची अवकळा आणि सद्य:कालीन बौद्धिक विद्रोहाची ऱ्हासशील अवस्था श्रीकांत वर्मांच्या कवितेत एकंकार झालेली आहे, हे खालील एकदोन उदाहरणांवरून सहजच लक्षात येण्यासारखं आहे. "किंचाळत कपिलवस्तू" या कवितेतला हा उतारा पहा:

"जसं
मगध
मगध राहिलेलं नाही—
सगळे धष्टपुष्ट आहेत,
कुणीहि उरलं नाही
कृशकायेचं
कुणालाच दया नाहीय,
कुणातच
रया नाहीय,
कुणीहि विचार करीत नाही,
आणि जो करतो तो
पुन्हा दुसऱ्यांदा विचारात पडत नाही."

किंवा ''कोसल नावाचं गणराज्य'' मधील खालील ओळी पहा:
''माझ्या कल्पनेत

कोसल एक गणराज्य आहे.
कोसल मधे प्रजा सुखी नाहीये
कारण कोसल फक्त
कल्पनेतच गणराज्य आहे''

आणि खुद्द मगधबद्दलच्या या ओळी :
''लोकांचं काय?''
लोक तर असंहि म्हणतायत
मगधचं आता फक्त नावच शिल्लक आहे
गाव म्हणून नाहीच.''

प्रत्येक थोर कवीचं सृजन त्यानं उपभोगलेल्या यातनामय अनुभवांच्या संचितावरच टिकून राहतं, आणि मानवी संस्कृतीही यातनामय अनुभवांचं संचित पचवूनच विकसित होत असते. प्रस्थापित राजकीय ज्वालामुखीच्या परिघात राहून जेव्हा अंतरंग यातनांनी भरून जातं, संस्कृतीची ऱ्हासशीलता वेदना होऊन ठसठसत राहते तेव्हाच 'मगध'सारखी कृती निर्माण होते. आता या वेदना शमलेल्या आहेत, विझून गेल्या आहेत— पण कवी गेला तरी त्याचं सृजन मागे उरतं ही संस्कृतीसाठीच किती उपकारक गोष्ट आहे!

३ जाने. १९८६ — चंद्रकान्त पाटील

मगध
(१९७९, १९८४)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## १. नान्दी

गुणग्राहक! गुणसागर! गुणनिधान!
खूप वर्षांनी
मी आपल्या दाराशी आलो आहे—

ऐका यजमान,
जन्म-जन्मांतरीच्या कथा
नगर-नागरिकांच्या व्यथा
घेऊन आलो आहे मी—

ओळखलंत मला?
वेताळ—
माझ्याच कृत्यांनी
मला
काळाच्यां एका रोगट फांदीवर
लटकवलेलं
होतं.

गुणग्राहक! गुणसागर! गुणनिधान!
आपल्याच दयेनं
मी नरयोनी
धारण केली आहे पुन्हा एकदा

आता आणखी एक वर द्यावा मला
जर मी आपल्याला स्वर देऊ शकलो नाही
तर आपणच
स्वर द्यावा मला.

[stamp]

## २. मगध

अहो घोडेस्वार, मगध कुणीकडे आहे
मगधहून आलो आहे
मगधला
जायचं आहे मला

कुणीकडे वळू
उत्तरेला की दक्षिणेला
पूर्वेला
की पश्चिमेला?

घ्या, ते दिसू लागलं मगध
घ्या, ते अदृश्य·

कालच तर सोडलं होतं
मी मगध
कालच तर म्हणालो होतो
मगधवासियांना
की मगध सोडू नका
मी दिलं होतं वचन—
सूर्योदयाच्या आधी
येईन परत

मगध नाही, की मगध नाही
तुम्ही पण मगधच शोधत आहात
बंधूनो,
हे ते मगध नाही
ज्याविषयी तुम्ही वाचलं होतं
पुस्तकांत,
हे ते मगध आहे
जे तुम्ही
माझ्यासारखंच हरवून
बसला आहात.



१९७९

## ३. मगधचे लोक

मगधचे लोक
मृतांची हाडं वेचू लागले आहेत

अशोकाची कोणती आहेत?
आणि चंद्रगुप्ताची?
नाही नाही,
ही बिंबिसाराची असू शकत नाहीत
अजातशत्रूची आहेत–

म्हणतात मगधचे लोक
आणि आसवं ढाळतात

स्वाभाविक आहे

ज्यानं एखाद्याला जिवंत पाहिलं आहे
तोच त्याला
मेल्यावरही पाहू शकतो
ज्यांनी जिवंत पाहिलेलं नाही
मेलेलं तरी कसं पाहणार?

कालचीच गोष्ट आहे
मगधवासियांनी
अशोकाला पाहिलं होतं
कलिंगला जाताना
कलिंगहून येताना
चंद्रगुप्ताला तक्षशिलेच्या दिशेनं घोडं पळवताना
आसवं ढाळताना
बिंबिसाराला
अजातशत्रूला
बाहू थोपटताना
पाहिलं होतं
मगधच्या लोकांनी
आणि ते
विसरू शकले नव्हते
की त्यांनी त्यांना
पाहिलं होतं

जे आता
शोधूनही
दिसू शकत नाहीत.

## ४. काशीतलं प्रेत

तुम्ही काशी पाहिलीत?
जिथून, ज्या रस्त्यानं
जात असतं प्रेत—
त्याच रस्त्यानं
येत असतं प्रेत!

प्रेतांचं काय!
प्रेतं येतील
प्रेतं जातील—

विचारा तर, कुणाचं आहे हे प्रेत?
रोहिताश्वाचं?
नाही नाही,
प्रत्येक प्रेत रोहिताश्वाचं असू शकत नाही

जे असेल
ओळखलं जाईल दुरूनच
दुरून नाही, तर
जवळून—
आणि जर जवळूनही नाही,
तर ते
रोहिताश्वाचं असू शकत नाही
आणि असलं तरी,
काय फरक पडणार आहे?

मित्रांनो,
तुम्ही तर पाहिलीच आहे काशी
जिथून, ज्या रस्त्यानं
जात असतं प्रेत
त्याच रस्त्यानं
येत असतं प्रेत

तुम्ही फक्त एवढंच तर केलंत—
रस्ता दिलात
आणि विचारलंत—
कुणाचं आहे हे प्रेत?

ज्या कुणाचं होतं
आणि ज्या कुणाचं नव्हतं,
काही फरक पडला का?

१९८४

# ५. काशीचा न्याय

सभा विर्साजत झाली
सभासद चालू लागले
जे व्हायचं ते झालं
आता आपण चेहरा पाडून का आहात?
कसली चकमक आहे?
कुणाला भीत आहात?

निर्णय आम्ही घेतला नाही—
मान डोलवण्याचा अर्थ निर्णय होत नाही
आम्ही तर विचारसुद्धा केला नाही

चर्चा करणाऱ्यांनी चर्चा केली
आम्ही काय केलं?

आमचा काय दोष?
सभा बोलवणारे आम्ही नाहीत
आणि निर्णय घेणारेही
वर्षातून एकदा
काशीत येतो—
फक्त एवढंच सांगायला की
सभा बोलवण्याचीही गरज नाही
प्रत्येक व्यक्तीचा निर्णय
जन्माअगोदरच ठरून गेला आहे

## ६. कोसंबी

विचारते आहे वासवदत्ता
कोसंबीच्या
आधी काय होतं?

वासवदत्ता!

कोसंबीच्या आधी
केवळ
कोसंबी होतं

कोसंबीनंतर
केवळ कोसंबीच आहे

कोसंबीच्या बदल्यात
केवळ
कोसंबीच
असू शकतं

कोसंबीचा पत्ता विचारणारी
वासवदत्ता
कोसंबीला
पोहोचली आहे

१९७९

## ७. हस्तिनापुर

जरा विचार करा
त्या व्यक्तीचा
जी हस्तिनापुरात येते
आणि म्हणते
नाही, हे हस्तिनापुर असू शकत नाही.

जरा विचार करा
त्या व्यक्तीचा
जी एकाकी पडली आहे—
कधीही घडलं असेल महाभारत
फरक काय पडणार आहे?

शक्य असेल
तर विचार करा
हस्तिनापुराचा
ज्यासाठी
थोडचा थोडचा अंतरानंच
घडू लागलं आहे महाभारत
आणि कुणाचंही बिघडत नाही काही
त्या व्यक्तीशिवाय
जी येते हस्तिनापुरात
आणि म्हणते,
नाही नाही, हे हस्तिनापुर असू शकत नाही.

## ८. हस्तिनापूरंची रीत

मी पुन्हा एकदा सांगतो की
धर्म राहिला नाही तर काहीच रहाणार नाही—
पण माझं
ऐकत नाही कुणीच!
हस्तिनापुरात ऐकायची रीतच नाही—

जे ऐकतात
ते बहिरे आहेत
किंवा मग
न ऐकल्यासारखं करण्यासाठीच
नियुक्त केले गेले आहेत

मी पुन्हा पुन्हा सांगतो की
धर्म उरला नाही तर काहीच उरणार नाही—
पण माझं
कुणीच ऐकत नाही

तर ऐका वा ऐकू नका
हस्तिनापुरच्या रहिवाश्यांनो, जागे व्हा!
हस्तिनापुरात
तुमचा एक शत्रू वाढू लागला आहे, विचार—
आणि लक्षात ठेवा,,
हल्ली पटकीसारखा फैलावत चालला आहे
विचार.

## ९. कपिलवस्तू

कपिलवस्तूत दिवसा डोळे चुरचुरतात
रात्री
रंगमहालात बुडून गेलेल्या असतात

वृद्ध वृद्ध झाल्यामुळे हद्दपार केले जातात
सरहद्दीवर
थबकून
कपिलवस्तूकडे टक लावत
लालसा जागवतात

कधी कधी नववधू
स्वप्नं बघत
दचकतात

कपिलवस्तूत वृद्ध नाहीत
फक्त
वृद्ध होण्याचं भय आहे
कपिलवस्तूमधे वृद्धच असू नयेत
एवढाच अर्थ आहे
तरुण असण्याचा

कपिलवस्तूला फार काळ
लोटला
नाहीय्

१९७९

## १०. किंचाळत कपिलवस्तू

महाराज! मागं फिरावं–
उज्जैनीवर अंमल' बजावण्याची इच्छा
माझ्या मते,
व्यर्थ आहे–

उज्जैनी
उज्जैनी राहिलेली नाही–
न्याय उरला नाही
की अन्याय

जसं मगध
मगध राहिलेलं नाही–
सगळे धष्टपुष्ट आहेत
कुणीच राहिलं नाही
कृशकायेचं

कुणालाही दया नाही
कुणातच
रया नाही
कुणीही विचार करीत नाही
जो करतो
दुसऱ्यांदा पडत नाही विचारात.

जवळजवळ हीच स्थिती आहे काशीची–
काशीत
प्रेतांचा हिशोब चालला आहे
कुणालाही
जित्याजागत्यांसाठी फुरसत नाही
ज्यांना आहे,
जिवन्त नू मृतातला भेद कळत नाही!

मिथिलेचं बघा–
परवाचीच गोष्ट आहे
राज्य करीत होते विदेह
त्याच मिथिलेत
राज्य चाललं आहे संदेहाचं

कुणालाही धर्माची भीती उरली नाही–
विश्वामित्र, वशिष्ठ
कुणीच उरले नाहीत–
महाराज! नश्वर आहेत सगळेच
अमर कुणीच नाही.

जायचंच असेल तर कपिलवस्तूला जाऊ!
जो कपिलवस्तूला जातो
पुन्हा परत येत नाही
जो जात नाही कपिलवस्तूला
आयुष्य घालवतो
कपिलवस्तू–कपिलवस्तू किंचाळत!

१९८४

## ११. तक्षशिला

तक्षशिलेत सैनिक दिसू लागले आहेत
एकटे-दुकटे
कुणाला शोधत आहेत
नि:स्तब्ध का आहेत

किल्ल्यापर्यंत जाऊन
परत
का येत आहेत
एकटे-दुकटे

बघत आहेत
गोंधळून,
काहीच उरलेलं
नाही मागे

फक्त एक ढिगारा
राहून-राहून
ओरडत आहे,
कुणी मला
उभारलं आहे?



१९७९

## १२. उज्जैनी

कालिदासानं
ज्या गणिकेवर प्रेम
केलं होतं
उज्जैनीत
कस्तुरीसारखी
रहात होती
ती
केवढा योगायोग होता
उज्जैनी होती
कालिदास होता
कस्तुरी होती

कधी-कधी
नक्षत्रयोगांमुळे
घडतं असं

आता ते कुणाला
शोधू
लागले आहेत
महाकालाला
विचारीत
आहेत—

कस्तुरीसारखी
रहात होती
जी,
ही
तिचीच
नगरी आहे का?

कालिदासाने ज्या
गणिकेवर
प्रेम केलं होतं
ती
याच रस्त्यानं
गेली होती का?

थांबा थांबा,
हे
कुणाचं
शव आहे
जे क्षिप्रेनं
आणलं
आहे?



१९७९

## १३. उज्जैनीचा रस्ता

उज्जैनीला जाण्यास उत्सुक प्रवाश्यांसाठी निवेदन आहे :
हा रस्ता उज्जैनीला जात नाही
आणखी हे की हाच रस्ता उज्जैनीला जातो

मी कालपरवापर्यंत रस्ता दाखवत होतो
हे सांगत की
सावधान! हा रस्ता उज्जैनीला जातो
मी आजही रस्ता दाखवत आहे
हे सांगत की
सावधान! हा रस्ता उज्जैनीला जात नाही

प्रवाश्यांनो!
खरं तर हेच की
प्रत्येक रस्ता उज्जैनीला जातो
आणि हेही की
कुठलाही रस्ता उज्जैनीला जात नाही

उज्जैनी
निरंतर वाट बघत असते
उज्जैनीनं
रस्त्यावरून तोंड फिरवलं आहे

तर मग
ज्यांना उज्जैनीला जायचं आहे, कुठं जावं?
त्यांनी उज्जैनीला जावं
आणि सांगावं
ही उज्जैनी नाही
कारण आम्ही
त्या रस्त्यांनी आलो नाहीत
जे उज्जैनीला जातात
किंवा उज्जैनीला जात नाहीत

१९८४

## १४. अवंतीत अनामिक

मी जर म्हणालो
की मी मगधचा नाही
अवंतीचा आहे,
तर काही फरक पडणार आहे?

नक्कीच पडेल
तुम्ही अवंतीचे समजले जाल
आणि मगध विसरावं लागेल

आणि तुम्ही
मगध विसरू शकणार नाहीत
आयुष्य अवंतीत घालवलं तरीही
तुम्ही
अवंती समजू शकणार नाहीत

मग तुम्ही पुन्हा एकदा म्हणाल,
मी अवंतीचा नाही
मगधचा आहे
आणि कुणीच विश्वास ठेवणार नाही
ओरडून सांगावं लागेल—
'मी खरंच सांगतो आहे
मगधचा आहे मी
अवंतीचा नाही'

आणि काहीच फरक पडणार नाही
तुम्ही मगधचे
समजले जाणार नाहीत
आणि अवंतीत
ओळखले जाणार नाहीत

१९८४.

## १५. अफवा

महोदय
ऐकत रहा
आम्ही आणि आपण
ज्या पाटलिपुत्रसाठी लढत आहोत
इतरांच्या दृष्टीनं
ती एक अफवा आहे

ऐकलंत आपण?

एवढ्याही लायकीची नाही
की ती त्यावर टिकू शकेल फार काळ
विचारत आहेत, ते
कोणतं पाटलिपुत्र?

महोदय, आता आपण द्यावं
उत्तर
समजवून सांगावं–
हेच ते पाटलिपुत्र
ज्यासाठी
लढत आहेत
अजातशत्रू, बिंबिसार,
चंद्रगुप्त,
आम्ही आणि आपण
सांगितलंत समजावून?

महोदय,
ऐकलंत त्यांचं मत?
'मूर्ख
एका अफवेसाठी लढत आहेत!'


१९८४

## १६. दुसरीच एखादी अमरावती

महाराज
ही ती अमरावती नाही
दुसरीच एखादी
अमरावती आहे

हिच्यासाठी लढायला कुणीच तयार नाहीत
कुणीच ओरडत नाही
'पणाला लावलं आहे
मी स्वत:लाच
अमरावतीसाठी'

कुणीही मारत नाही
मिशीवर ताव
'अमरावती माझी आहे'

महाराज
ही ती अमरावती नाही
जी कालपर्यंत आपली होती

सगळ्यांचीच झाली आहे ती

दूर केल्या गेल्या आहेत
स्मृतिशय्या
दिसत नाहीत गणिका
काहीच उरलं नाही
ना रंगमंच, ना नायक, ना नायिका

कृपासिंधू!
विसरून जा की अमरावती आपली होती
होती जरी–
तिच्यासाठी लढायला कुणीच तयार नाहीत.

१९८४

## १७. नालंदा

मी तर चाललो आहे तक्षशिलेला,
तुम्ही
कुठं चालला आहात?

नालन्दाला

नाही,
हा रस्ता
नालंदाला जात नाही,
कधीकाळी
जायचा
नालंदाला,
आता नाही.

नालंदानं
आपला
रस्ता बदलला आहे
आता या
रस्त्यानं
नालंदाला नाही,
तक्षशिलेला
पोहचाल तुम्ही.
यायचं आहे का तक्षशिलेला?

नालंदाला जाणाऱ्या मित्रांनो,
नेहमी
असंच होतं,
दाखवण्यात आलेले
रस्ते
तिथं जात नाहीत
जिथं
आपल्याला पोहचायचं असतं—
उदाहरणार्थ—
नालंदा.

१९८४

## १८. मिथिला का नाही?

राजे, चिंताक्रांत होऊ नका–
चिंतेनं काया कृश
होते,
आणि आत्मा निस्तेज,
स्वर क्षीण होतात!
चिंता करू नका–

हे काही खरं नाही
की संपूर्ण मिथिलेत
एकही कवी नाही
की सबंध गणराज्यात
एकही शिल्पकार नाही
की मिथिला सफळसंपूर्ण आहे
फक्त गायकेच नाहीत

राजे,
गायकांच्या
असण्या-नसण्यानं
काही फरक पडत नाही–

फरक पडतो तो संपत्तीनं,
सैन्यानं, मंत्रिपरिषदेनं!
पहावं लागतं,
प्रजा सुखी आहे की नाही?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

अवंतीत
गायक शिंल्पकार, कवी
असूनही काय करीत आहेत?

म्हणतात, राजे, की
अवंती रचत आहेत
आणि स्वतःला
मृत्यूपासून वाचवत आहेत
की प्रक्रिया संपत नाही कधी
अवंती आहे आणि अवंती राहीलच

राजे, मला
काहीच समजलं नाही—
मिथिला का नव्हती?
मिथिला का नाही?

१९८४

## १९. मथुरेचा शोक

ऐकत आहात ना मथुरेचा शोक?
असंच होतं—

मथुरा न उरल्यानं
मथुरा शोक करीत आहे—
मथुरा! मथुरा!

मथुरा एक उदाहरण आहे—
अवंतीचं बघा.
लक्ष देऊन ऐका—

ऐकलंत तुम्ही?
थांबून—थांबून ठणका उडत आहे
अवंती! अवंती!

सांगितलं ना मी—
मथुरा न उरल्यानं मथुरा
अवंती न राहिल्यानं अवंती
शोक करीत असतात लोक

शक्य आहे, लोकांना
रडायची सवयच पडून गेली आहे
एकेक नगर स्मृतिशेष झाल्यामुळे

पण—
मथुरा आणि अवंती
या नाहीत स्मृती

आणि समजा असल्या तरी,
कुणी मानणार आहे का
की मथुरा आणि अवंती
आहेत केवळ स्मृती?

१९८४

## २०. वैशाली–१

वैशालीतील लोकांच्या जिभेवर
फक्त एकच नाव आहे–
आम्रपाली!

सुखी आहे आम्रपाली की प्रत्येक जण
ओळखतो तिला
दु:खी आहे आम्रपाली की कुणीच
ओळखत नाही तिला

जे ओळखतात
सारखं आम्रपाली आम्रपाली म्हणत
वैशालीत येतात
बाकीचे
वैशालीला टाळत असतात

वैशालीच्या रहिवाश्यांनो, आम्रपाली
फक्त एक प्रसंग आहे–
जे दुसऱ्यांना समजू शकतात ते
आम्रपाली, आम्रपाली उद्घोष करीत
वैशालीत येतील

ज्यांना दुसऱ्यांना समजून घ्यायची इच्छा नाही–
आम्रपालीच्या आड
वैशालीपासून नजर चुकवत
निघून जातील!

१९८४

## २१. वैशाली—२

आम्ही असू, वैशाली असेल
आम्ही नसलो तर?
वैशाली असेल.

वैशाली नगरी नाही
स्मृती आहे
त्यांची
जे आले होते आमच्या आंधी—

म्हणत होते जे
आम्ही असू, वैशाली असेल.
आम्ही नसलो तर?
वैशाली असेल.

१९८४

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ........
ग्रंथ. शाखा (स्थळ

## २२. कोसल गणराज्य

कोसल माझ्या कल्पनेत एक गणराज्य आहे
कोसलमधे प्रजा सुखी नाही
कारण कोसल फक्त कल्पनेतच गणराज्य आहे

नागरिक
दिवसभर जुगार खेळत बसतात
आणि जे खेळत नाहीत
ते पेंगत असतात

नागरिक
दिवसभर किस्से सांगत असतात
आणि जे सांगत नाहीत
ते पेंगत असतात

नागरिक
दिवसभर चिडचिडत असतात
आणि जे चिडचिडत नाहीत
ते पेंगत असतात

नागरिक
कोसलच्या भूतकाळानं
पुलकित होतात
आणि जे होत नाहीत
ते पेंगत असतात

कोसल माझ्या कल्पनेत एक गणराज्य आहे

१९८४

## २३. कोसलमधे विचारांची उणीव आहे

महाराज, अभिनंदन! महाराजांचा विजय असो!
युद्ध झालं नाही—
आणि शत्रू परत गेले.

तशी आमची जय्यत तयारी होती
चार अक्षौहिणी सैन्य होतं
दहा हजारांचं घोडदळ,
अंदाजे तेवढेच हत्ती.

कसूर कसलीच नव्हती!

युद्ध जरी झालं असतं
निकाल हाच होता.

त्यांच्याजवळ शंस्त्रं नव्हती
घोडदळ नव्हतं
आणि हत्तीही नव्हते
युद्ध करणार तरी कसं?
निःशस्त्र होते ते.

त्यांच्यातला प्रत्येक जण एकाकी होता
आणि प्रत्येक जण हेच म्हणायचा
की प्रत्येक जण एकाकीच असतो!

काहीही असो
हा आपलाच विजय आहे
अभिनंदन!
राजसूय पूर्ण झाला आहे
आपण चक्रवर्ती झालात—

त्यांनी फक्त काही प्रश्नं मागे ठेवलेत
उदाहरणार्थ हे की—

कोसल फार काळ टिकू शकत नाही
कोसलमधे विचारांची उणीव आहे!

१९८४

## २४. कोसलची शैली

बाहेर यावं महाराज, बाहेर
आपली कीर्ती
चंद्रिकेसारखी
        उमलली आहे
सगळे सुखी आहेत
कुणीच म्हणत नाही
        की मला काही सांगायचं आहे

काहीतरी झालं आहे
कुणीही
        काहीही म्हणत नाहीत
भयभीत आहेत
        म्हणायचं म्हणून
एवढंच म्हणत आहेत–
मी सुखी आहे

महाराज, न सांगता कुणी
कसं काय
        राहू शकतं सुखी
केलाय् विचार आपण?

तसं तर कीर्ती महाराजांची
        चंद्रिकेसारखी उमललेली आहे
सांगायला म्हणून तरी
        काय असू शकतं?

एवढं नक्कीच सांगू शकतो की
        जो विचार करतो
        तो बकबक करतो
त्याचं बकणं
        शैली बनतं
दु:ख एवढंच
        कोसलची अजूनही
        अजूनही
शैली तयार झालेली नाही

काहीही असो
        आपण तर बाहेर यावं महाराज
गर्दी
        एक तालासुरात सांगत आहे–
सुखी आहोत
        आम्ही सुखी आहोत!

महाराज,
        जेवढं ते म्हणत आहेत
आपणही
तेवढंच सांगावं–
'प्रजाननांनो,
        सुखी रहा!'

१९८४

## २५. श्रावस्ती

जे श्रावस्ती सोडून निघून गेले होते
ते परतले आहेत–

अजूनही भिक्षुक येतात
पुन्हापुन्हा सांगतात
दुःखाला घाबरून
जे गेले त्यांना
दुःखच मिळेल

जो येतो
तो दुःखी होतो
जो जातो
तो दुःखी होतो

कोसलमधेही तेवढंच दुःख
जेवढं
श्रावस्तीत

श्रावस्ती सोडून कोसलमधे वास्तव्य करणारे
परत आले आहेत–
बोलायची खूप इच्छा आहे श्रावस्तीला
बोलता येत नाही.

१९७९.

## २६. लिच्छवी

लिच्छवि जे गेलेले लिच्छवि येतील पुन्हा

महालांमधे असेल दीप्ती
अंतःपुरिही
दुसऱ्यांदा कंकण किणकिणतिल

सजतिल हाट नि
होइल बोली
असेल भिक्षा
असतिल भिक्षुक
असेल इच्छा
असतिल इच्छुक

मग विधवा या उदासीन का?
वैशालीमधि सामसूम का?

सत्य असे की लिच्छवि कधि येणारच नाहित

आले जरि तरि
    तेच सांगतिल
आम्ही होतो लिच्छवि, अन् आहोतहि लिच्छवि
सांगत सांगत
    निघून जातिल

कधीकधी असतात लिच्छवी
म्हणून तर ते होत लिच्छवी

१९७९

## २७. वसंतसेना

पायऱ्या चढत आहे
वसंतसेना

आत्ताच तुला कळणार नाही
वसंतसेने
अजून तू तरुण आहेस

पायऱ्या संपत नाहीत
कधीच
मग त्या प्रगतीच्या असोत
की
अधोगतीच्या

आगमनाच्या असोत
की
प्रस्थानाच्या
किंवा मग
मरणाच्या
किंवा अभिमानाच्या

अजून तुला
कळणार नाही
वसंतसेने

पायऱ्या
चढणं
सोपं नाही
की
पायऱ्या
उतरणं
ज्या पायऱ्यांवर
चढत असतो आपण
त्याच पायऱ्यांवरून
उतरतो आपण
अलिप्त असतात पायऱ्या

कोण चढत आहे
कोण उतरत आहे
चढणारा उतरत आहे
की
उतरणारा चढत आहे
किती चढून झाल्यात
किती उतरायच्या आहेत

पायऱ्या मोजू शकत नाहीत
की ऐकू शकत नाहीत

वसंतसेने.

१९८४

## २८. अंबपाली

झोपली आहे वैशाली
जागत आहे
फक्त
अंबपाली

अंधार आहे
दुसऱ्याच कुठल्यातरी जगात
हळूहळू
उगवणारी
सकाळ आहे

नक्षत्रं निखळून पडत आहेत

वैशालीत लोक
जन्मत आहेत
मरत आहेत

झोपली आहे वैशाली
किंवा मग
मेली आहे
अम्बपाली
स्वप्नातच
घाबरली आहे

भिऊ नकोस, वैशाली!

१९७९.

## २९. अश्वारोही

अश्वारोही
जो कलिंगला जातो
तो कलिंगहून आहे तसाच परत येतो का?

लोक काय म्हणतात–
जेता
        की मारेकरी?
स्वागत
करतात का
        वधू
की
भटकतो तो वणवण?

काय होतं नेमकं?

अश्वारोही
हा रस्ता कुठं जातो?

१९७९

## ३०. हादरा

पुनव होती.
चंद्र होता.
आरसा होता.

आरश्यात
हुबेहूब
चंद्रासारखंच होतं
चंद्राचं
प्रतिबिम्ब.

खूप वेळ
टिकून राहिल्यानंतर
सरकत जाणारा
चंद्र
चौकटीच्या
बाहेर
गेलेला
होता.

मी म्हणालो,
किती विलक्षण
शान्तता आहे!

लगेचच
ती
दिसली
आरश्यात—

मी
विचारायच्या
आधी की
तू कोण आहेस,
ती
अदृश्य
झालेली
होती.

कित्येक वर्षांनी
त्या
दिवसाची
घटना
आठवताना
लख्ख्कन् चमकून गेलं–
अरे, ती तर
पद्मिनी!

'तरीच'
मी म्हणालो,
'तरीच
त्या हादऱ्यानं
दुभंगलोत
दोघंही–
आरसा
आणि
मी.'

१९८४

## ३१. येरझारा

ज्या ज्या वेळी तो गेला
कोसलहून मगधला
मगधहून कोसलला
येताना
प्रत्येकानं त्याला हेच विचारलं—

मगधहून कोसलला
जात आहात
की कोसलहून
मगधला येत आहात?

काय फरक पडणार आहे,
असं म्हणून
त्यानं
उत्तर टाळायचा प्रयत्न केला

पण काही
प्रश्न
टाळताच येत नाहीत—
विशेषतः तेव्हा जेव्हा
बऱ्याचदा जातो आपण
कोसलवरून मगधला
मगधवरून कोसलला.

सगळ्यांत पहिला प्रश्न हा
की कुठं जात आहात?

कोसल आणि मगधमधे
कुणाला
शोधत आहात?

आणि हे की
कोसल
आधी लागतं
का
मगध?

खरं तर हेच आहे की
कुणालाच माहीत नाही,
तो पुन्हापुन्हा मगधहून कोसलला
कोसलहून मगधला का जात असतो?

तीच-तीच दृश्यं का बघत बसतो?

का म्हणून
मगधहून जाताना
कोसलच्या बाजूनं
कोसलहून जाताना
मगधच्या विरोधात
घोषणा देत असतो?

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ........
संदर्भ शाखा (स्थळ

का
कोसलच्या पडक्या किल्ल्यांवर
मगधचे
फाटके झेंडे
फडकवीत असतो?

जेव्हा कुठूनही कसलंच
उत्तर मिळत नाही
तेव्हा तोही
त्यांच्यात
सामिल होतो
जे येणाऱ्या-जाणाऱ्याला पकडून
विचारत असतात–

कोसलवरून
मगधला जात आहात
की
मगधवरून
कोसलला?

१९८४

## ३२. मित्रांचे प्रश्न

मित्रांनो
असं म्हणण्याला काहीच अर्थ नाही
की मी परत येऊ लागलो आहे

प्रश्न हा आहे की तुम्ही कुठं जात आहात

मित्रांनो
असं म्हणण्यात काहीच मतलब नाही
की मी काळासोबत चाललो आहे

प्रश्न हा आहे की काळ तुम्हाला बदलवत आहे
की तुम्ही
काळाला बदलवत आहात?

मित्रांनो
असं म्हणण्याला काहीच अर्थ नाही
की मी स्वगृही येऊन पोहोचलो आहे

प्रश्न हा आहे की
यानंतर कुठं जाणार आहात?

१९८४

## ३३. छाया

कित्येक वर्षांनी कळलं
की जी
सोबत होती
ती छाया नव्हती

मी तुडवलं
ती कण्हली
बोलवलं
लाजली
दटावलं
तिनं पायांना
विळखा घातला
म्हणालो
पिच्छा सोड
थबकली

मी पुढं होऊन जागेवर बसलो
भरल्या सभेत
जवळ
येऊन
बसली
सभा
विसर्जित झाली
मंडळी
निघून गेली
आणि अजूनही जी सोबत आहे
ती छाया असूच शकत नाही!

१९७९.

## ३४. हवन

पाहिजे तर वाचू शकलो असतो
पण वाचणार तरी कसा
जो वाचेल
तो रचेल कसा

आधी मी होरपळलो
मग भडकलो
तडतडू लागलो

कण्हू शकलो असतो
पण कण्हणार कसं
जो कण्हेल
तो निभावून जाणार तरी कसा

हे हौतात्म्य नव्हतं
की बलिदान नव्हतं
आत्मपीडन नव्हतं
की सजा नव्हती
तर मग
हे होतं तरी काय

कुणाच्या तरी माथी मढवू शकत होतो
पण मढवणार तरी कसं
जो मढवील तो घडवील तरी कसा

१९७९

## ३५. बुद्धकालीन गणिकेचा स्वप्नभंग

हात फिरवताच ठणकतात
स्तन
नाभीतून उमलतो सुगंध

जांघांवर
होतात स्वार
फक्त बलिष्ठच
उतरवतात
नदीत अश्व

शोधायला येतात अपार सुख
सेनापती
युवराज.

मूर्च्छित होतात स्त्रिया!

मालती
उद्या हे घडणार नाही
पिपात
भरले जातील स्तन
जांघा
स्मारकांसारख्या
तुटून पडलेल्या असतील

फक्त चाहूल
ऐकू शकशील–
कोण?
सेनापती?
का युवराज?

आटलेली असेल
सुखाची नदी

थट्टा करतील तें
कालपर्यंत जं उनरवायचे
अश्व,
तूही हसशील

शव नदीतून बाहेर काढून
मोडून जातात लोक
काठावर
आणि म्हणतात–
हा बघा काळ

मालतीला कुणीच पाहिलं नाही.

फिरवताच हात
ठणकत असत
स्तन.

जांघांवर बलिष्ठ
होत असत
स्वार.

शोधायला येत असत
अथांग सुख
युवराज.

मूर्च्छित होत असत
महिला.

केवढी ही दुर्दशा
मालती
उद्याही तू
मालतीच.

१९८४

## ३६. कृपा आहे महाकालाची

अर्धे रडतात, अर्धे हसतात
सगळे अवंतीतच वसतात

कृपा आहे महाकालाची

अर्धे मानतात, अर्धं
असणं तितकंच
सार्थ आहे जितकं असणं पूर्ण

अर्ध्यांचा दावा आहे, तितकंच
निरर्थक आहे असणं
पूर्ण जितकं असणं अर्धं

अर्धे निरुत्तर आहेत, अर्धे वादविवादात
सगळे अवंतीतच असतात

कृपा आहे महाकालाची

अर्धे म्हणतात अवंती
अगदी तश्शीच अर्धी
जशी आहे काशी

अर्ध्यांचं म्हणणं आहे
दोन्हीतही रहातात
केवळ प्रवासी

दोघंही तर्कजाळ्यात फसतात
दोघंही अवंतीतच वसतात

हसतात
काशीचे पंडित अवंतीच्या ज्ञानाला
अवंतीचे लोक काशीच्या अनुमानाला

कृपा आहे महाकालाची

१९८४

## ३७. मूळ

गप्प का आहात, मित्रांनो?

झालंय् तरी काय, मगधमधे?

महाराजांचं महानिर्वाण झालं?
की महाराणींनी पुन्हा कन्यारत्नाला जन्म दिला?

पुन्हा युद्धाची घोषणा झाली?
की पुन्हा निषेधाज्ञा लागू करण्यात आली?

झालं आहे तरी काय?
गप्प का आहात?

जहरमोहरा निकामी झाला का?
मगधमधे कुणीच उरलं नाही कां?

कधीमधी
मगधला काय होतं कुणास ठाउक?
सगळं नेहमीसारखंच नीटनेटकं असूनही.

कुणी बोलत नाही
कुणीच तोंड उघडत नाही
फक्त शकटार
मुळाला स्पर्श करून
अख्ख्या झाडाची कल्पना करीत बसतो
विचार करून-करून थरथर कापत असतो
मित्रांनो
जो विचार करतो
तो भयभीत होणारच!

१९८४

## ३८. अंतःपुरात शोक

अंतःपुरात विलाप कशासाठी?

पहा
विचारा
माहिती काढा
जाणून घेऊ इच्छितात
महाराज–

जेव्हा
सभोवार
फुलबाज्या
उडत आहेत
हर्षाच्या,

प्रत्येक जण
विचार करीत आहे
आपल्या
उत्कर्षाचा,

संताप कशासाठी?

जेव्हा सगळेच
म्हणत आहेत
छान
झालं आहे

पश्चात्ताप कशासाठी?

जेव्हा
सगळे
गुण्यागोविंदानं
रहात आहेत

जेव्हा
सगळे
नीट विचारांती
बोलत आहेत
प्रलाप कशासाठी?
माहिती घ्या.

१९८४

## ३९. जो तरूण होता

परत येतील सगळे
तो सोडून
जो तरुण होता–
तारुण्यावस्था परत येत नसते.

आणि आला जरी
अगदी तसाच असणार नाही तो.

पिकलेले केस, सुरकुत्या
वार्धक्य
थकवा
तो असेल जख्खड म्हातारा.

रस्त्यावरच
माणूस म्हातारा होणं
स्वाभाविक आहे–
रस्ता सोपा असो की कठिण

कुणाला इच्छा होईल
म्हातारा म्हणवून घेण्याची?

कोण कशाला आपले
पिकलेले केस
मोजील?

कोण कशाला
चेहऱ्यावरच्या सुरकुत्या बघून
दचकण्याची इच्छा धरील?

कोण इच्छा करील
की कुणी त्याला म्हणेल
माणूस किती लवकर म्हातारा होतो, नाही—
तुमचंच बघा की!

कुणाला इच्छा होईल
की आपण
व्हावं जरा, मरण आणि थकव्याचं उदाहरण?

परत येतील सगळेच
फक्त त्याच्याशिवाय
जो तरुण होता.

१९८४

## ४०. मणिकर्णिकेचा डोंब

डोंब मणिकर्णिकेला बऱ्याचदा म्हणतो
दु:खी होऊ नकोस
मणिकर्णिके
दु:ख तुला शोभून दिसत नाही
अशीही स्मशानं आहेत
जिथं एकही प्रेत येत नाही
आणि आलं तरी
त्याला गंगेत
आंघोळ घालत नाहीत

डोंब याशिवाय सांगू तरी
काय शकतो
एकटा
डोंबच तर आहे
जो राहू शकतो मणिकर्णिकेत
एकाकी

दु:खी होऊ नकोस, मणिकर्णिके
दु:ख मणिकर्णिकेच्या
प्रकृतीतच नाही
ते त्यांच्या कपाळी आहे
जे पोहोचवायला येतात
त्यांच्या कपाळी होतं
ज्यांना सोडून ते निघून जातात

सुदैवी आहेत ते ज्यांना
पुढं घालून् वा खांदा देऊन
आणलं जातं काशीत
दुःख
मणिकर्णिकेवर सोपवून जातात जे

दुःखी होऊ नकोस
मणिकर्णिके

दुःख आपल्याला शोभा देत नाही

असेही डोंब आहेत
प्रेतांची वाट बघता-बघता
ज्यांच्या डोळयांच्या गारगोटचा होतात
तरीही एकही प्रेत येत नाही—

याशिवाय डोंब सांगणार तरी काय!

१९८४

## ४१. धर्मयुद्ध

कसं शक्य आहे
दोन्हीकडे मृतांची संख्या सारखीच असणं

कसं शक्य आहे
एकाची पताका पडणं
तर दुसऱ्याचीही पताका पडणं
त्याच बाजूला
जितक्या विधवा असतील
दुसऱ्या बाजूला
सधवा
त्याहून अधिक नसणं

कसं शक्य आहे
एका राजधानीत जेवढा विलाप असेल
दुसरीकडे
तेवढाच
संताप असणं

दोन्हीकडे
पश्चात्ताप असणं
दोन्हीकडे
धर्म असणं
दोन्हीकडे
शरम असणं
दोन्ही बाजूंनी
शस्त्रं खाली ठेवणं
दोन्ही बाजू
यशस्वी होणं.

मी म्हणतो,
शक्य नाही

एकीकडे असते हत्या
एकीकडे विजय

एकीकडे मस्ती
एकीकडे भय

एकीकडे विधवा
एकीकडे सधवा

एकीकडे असतो विलाप
एकीकडे सन्ताप

एकीकडे हर्ष
एकीकडे पश्चात्ताप

एकीकडे असतो धर्म
एकीकडे शरम

दोन्हीकडे मृतांची संख्या
सारखीच असत नाही.

१९८४.

## ४२. उद्दिष्ट : चंपा

आम्हाला फक्त चम्पापर्यंतच जायचं आहे

हा रस्ता फक्त चंपापर्यंतच जातो
ज्यांना अजून कुठे जायचं आहे
त्यांनी दुसऱ्या कुठल्यातरी रस्त्यानं जावं
आम्ही चंपाला जाणाऱ्यांना
हे सांगून भटकवू नये–
हा रस्ता चंपापर्यंत जातो काय?

ज्यांना चंपाला जायचं आहे
त्यांना काहीच विचारण्याचा अधिकार नाही–
हे पण, की चंपा कुठे आहे?
हे पण, की चंपा कुठे नाही?
हे पण, की चंपा आहे का?
हे पण, की हे खरं आहे का–
चंपा होती, चंपा नाही?

आम्हाला फक्त चंपापर्यंत जायचं आहे

१९८४

## ४३. कनोजला जाणाऱ्यांची गणना

बंधूंनो आणि भगिनींनो, तुम्ही कुठे जात आहात?
आम्ही सगळे
कनोजला जात आहोत
कारण
सगळेच कनोजला जात आहेत

जे कुठेही जात नाहीत
कनोजला जात आहेत
जे क्वचितच कुठे-कुठे जात असतात
तेही कनोजला जात आहेत

ज्यांना प्रेम आहे कनोजबद्दल
कनोजला जात आहेत
ज्यांना द्वेष आहे कनोजबद्दल
कनोजला जात आहेत

ज्यांना कनोजविषयी
माहित नाही काहीच
कनोजला जात आहेत
ज्यांना कनोजविषयी
सगळं काही माहित आहे
कनोजला जात आहेत

कोण आहे असा, जो कनोजला जात नाहीये?

१९८४

## ४४. नियम

मी पुन्हा एकदा सांगतो, महाराज–
असं म्हणू नका:
'नियम बदलला जाऊ शकत नाही.
जो दुसऱ्यांना लागू होतो
तो मलाही होणारच.'

सभेला निरुत्तर करायचे
इतरही आहेत उपाय–
सत्य अपरिहार्य नाही
सत्याचा अशा प्रकारे अपव्यय
उचित नाही–

निरुत्तर करायचं असेलच सभेला
तर म्हणा–
'मोडला जाऊ शकत नाही
नियम
मात्र बदलता येऊ शकतो'.

म्हणा–
'आम्ही
नियमांचा भंग करत नाही
सगळ्यांसारखंच
घाबरतो नियमांना
कधी-कधी सर्वांग
ठणकू लागतं तेव्हा
नागरिकांनो,
तेव्हा आम्ही
नियमांत बदल करतो–
नियम सैल करणं शक्य असतं नेहमीच.'



१९८४

## ४५. पाटलिपुत्र

माथ्यावर रक्ताचा टिळा आहे
राज्याभिषेकाची
हीच पद्धत असते

कुणाचं आहे हे रक्त?
त्याचं तर नाही जो मगधचं
प्राणप्रिय
फूल आहे?
कुणाचंही असो
रक्त
फरक
काय
पडणार आहे?
फूलसुद्धा
कधीकधी
डोळ्यां-
त
पडतंच की
मौर्य अपशकुन
पहात नाहीत
मौर्यांचा असतो संबंध
विजयाशीच

तक्षशिला आणि नालंदेच्या मधोमध
मौर्य
आहेत
आणि
मार्ग आहे

पताका
फडफडू
लागली
आहे

दोष
फक्त
मौर्यां-
चाच
नाही

पूर्वीही
पंडितांनी
सांगितलेलं आहे–

पाटलिपुत्रात
रात्र
गडद
होऊ
लागली
आहे

 १९७९

## ४६. कवितेचा वाढदिवस

जे लिहिलं, ते होतं व्यर्थ
जे लिहिलं नाही,
तो अनर्थ.

१९८४

## ४७. हस्तक्षेप

कुणी शिंकतसुद्धा नाही
या भीतीनं
की मगधची शान्तता
भंग पावेल
मगध टिकवून ठेवायचं असेल तर
मगधमधे शांतता
राखलीच पाहिजे

मगध आहे तर शांतता आहे

कुणी किंचाळतसुद्धा नाही
या भीतीनं
की मगधच्या व्यवस्थेत
अडथळा येईल
मगधमधे व्यवस्था
टिकवलीच पाहिजे

मगधमधे नसली
तर असणार तरी कुठं?

लोक काय म्हणतील?

लोकांचं काय,
लोक तर असंही म्हणतात की
मगधचं आता फक्त नावच शिल्लक आहे
गाव म्हणून नाही

कुणी हटकतसुद्धा नाही
या भीतीनं
की मगधमधे
हटकण्याची चालच पडून जायची

एकदा का सुरुवात झाली
की कुठंच थांबवता येत नाही हस्तक्षेप–
तसं तर मगधच्या रहिवाश्यांनो
कितीही चुकवलंत
तरी वाचू शकत नाही हस्तक्षेपापासून–

जेव्हा कुणीच हस्तक्षेप करीत नाही
तेव्हा नगराच्या मधून जाणारं
मढं
हा प्रश्न विचारून हस्तक्षेप करतं
की माणूस का मरतं?

## ४८. सद्गती

मला जायचं आहे काशीला
मी म्हणतो
कोसलला चाललो आहे

काशीत आहे तरी काय—
मणिकर्णिका आहे
प्रेतं येतात
प्रेतं जातात

मला नाही जायचं काशीला

मला काशीला जायचं आहे

मी म्हणतो
दुर्दैवी आहे तो जो
काशीला जातो
कोसलला जात नाही

तुम्ही पाहिलं आहे कोसल
तर चला मग
मी कोसलला चाललो आहे

कोसल
आणि काशीत
फरक आहे—
कोसल काशी नाही

मला मरायची इच्छा आहे
कोसलमधे
मी म्हणतो—

धन्य आहेत ते, ज्यांना
काशीत सद्गती
मिळते

१९८४

मराठी ग्रंथ संग्रहालय

## ४९. शकटार

शकटार! शकटार!
शकटार नाहीये.
निघून गेला असेल कदाचित तक्षशिलेला.

शकटार! शकटार!
शकटार नाहीये.
परतला आहे कदाचित मगधला.

शकटार! शकटार!
शकटार नाहीये मगधमधे आणि तक्षशिलेतही
शकटार तुम्हाला कुठंही दिसणार नाही.

शकटार येतो तेव्हाच
जेव्हा चंद्रगुप्त येतो!

खून करतो शकटार
चंद्रगुप्त घालतो त्याच्या गळ्यात गळा
कधीकधी खून करतो चंद्रगुप्त
शकटार मान तुकवतो

शकटार नाहीये मगधमधे आणि तक्षशिलेतही.

१९८४

## ५०. तिसरा रस्ता

मगधमधे गोंधळ उडाला आहे
की मगधमधे राज्यकर्तेच उरले नाहीत
जे होते
मदिरा, मस्ती, आणि आळसामुळे
या योग्यतेचे
उरले नाहीत
की आम्ही त्यांना
मगधचा राज्यकर्ता म्हणावं

जवळजवळ असाच गोंधळ आहे
अवंतीत
असाच कोसलमधे
असाच
विदर्भात
की राज्यकर्ते उरले
नाहीत
जे होते
त्यांना मदिरा, मस्ती, आणि आळसानं
या
योग्यतेचं ठेवलं
नाही
की आम्ही त्यांना आमचे राज्यकर्ते म्हणावं
आता आम्ही काय करावं?

राज्यकर्ते नसतील
तर कायदेकानू नसतील
कायदेकानू नसतील
तर व्यवस्था नसेल
व्यवस्था नसेल
तर धर्म नसेल
धर्म नसेल
तर समाज नसेल
समाज नसेल
तर व्यक्ती नसेल
व्यक्ती नसेल
तर आम्ही नसू
तर आम्ही करावं तरी काय?
कायदा मोडावा?
धर्म सोडावा?
व्यवस्था विस्कळित
करून टाकावी?

मित्रांनो—
दोनच
रस्ते आहेत :
कुनीतीनं वागावं
नीतीवर चर्चा
करीत रहावी

दुराचरण करावं
सदाचारावर
चर्चा चालू ठेवावी

असत्य बोलावं
असत्य करावं
असत्य जगावं—
सत्यासाठी
प्राण देण्याची आण टाकू नये

शेवटी
प्राण तर
सगळेच सोडतात
निष्कारण
आपण
प्राण टाकू नये

मित्रांनो,
तिसरा रस्ता पण
आहे—
पण तो
मगध
अवंती
कोसल
किंवा
विदर्भा-
वरून
जात
नाही.

## ५१. मायामृग

जेव्हा मी तरुण होतो
तेव्हा एखादा जख्खड म्हातारा
काठी टेकवत
छाती गच्च धरत
रस्ता ओलांडताना
दिसला तर–

मी स्वत:साठी
प्रार्थना करायचो की
देवा,
वार्धक्य यायच्या आधीच
मला घेऊन जा

मग मी म्हातारा झालो
काठी टेकवत
छाती गच्च धरून
रस्ता ओलांडताना

प्रार्थना करतो आहे–

एवढ्यात नको!
ओलांडू तर दे
रस्ता,
अहो पांथस्थ,
जरा
माझा हात
धरा
आणि मला मदत करा–
एवढा रस्ता ओलांडण्यासाठी

१९८४

## ५२. पुरावा

वाळूवर उमटवून आपल्या पाऊलखुणा
विचारतात दुसऱ्या दिवशी लोक—
कुठं गेला
प्रवासाचा पुरावा?
माहित आहे का
त्यांना काय मिळतं
उत्तर?

बांधवांनो, जा
जिथं
वाळूच नाही

वाळूवर
टिकत नसते
कुणाचीच खूण

१९८४

## ५३. परती

मी त्याला याच रस्त्यानं
जाताना पाहिलं होतं:

एकटा नव्हता तो
सैन्य होतं
हत्ती होते
घोडे होते
रथ होते
वाद्यं होती—
पालखी होती.

त्या सगळ्यामधोमध
एका घोड्यावर स्वार
शांत
चालला होता तो
असा काही
जशी सगळी सूत्रं
त्याच्याच हातात होती
सगळे
फक्त मागोमाग
चालले होते.

वीस वर्षांनी
मी त्याला याच रस्त्यानं
येताना
बघतो आहे:

एकटा नाही तो
सैन्य आहे
हत्ती आहेत
घोडे आहेत
रथ आहेत
वाद्यं आहेत
—पालखी आहे.

त्या सगळ्यांमधोमध
एका घोड्यावर स्वार होऊन
शांत
अशा तऱ्हेनं चालला आहे
जशी सगळी सूत्रं
दुसऱ्याच कुणाच्या तरी
हाती आहेत
तो
फक्त मागोमाग
चालला आहे.



१९८४

## ५४. सामना

नदीत कुणाची तरी सावली बघून आपण
दचकतो
किंचाळतो :
नाही नाही, हे खरं असू शकत नाही!

पण हे खरं आहे

आपण
फक्त स्वतःला धीर देऊ शकतो :
भ्रम होता :
ही नदी नाही
की हे तेही नाही
ज्याला बघून
आपण दचकलो होतो

नदीपासून आपण
वाचवू शकत नाहीत स्वतःला

नदी स्वप्नात
येईल,
आठवण जागी करील

दचकाल
तुम्ही
किंचाळाल :
हेच आहे ते
ज्यापासून स्वतःला वाचवल्यावर
मी म्हणत असे,
आभार!

१९८४

## ५५. रोहिताश्व

जेव्हा जेव्हा मणिकर्णिकेला जाल
एक म्हातारा दिसेल
कोपऱ्यात दुमडून बसलेला

तुम्हाला बघून
त्याच्या डोळ्यांत
काहीतरी
चमकेल–

तो
रोहिताश्व, रोहिताश्व
म्हणत मुसमुसत
तुम्हाला मिठी मारील.

तेव्हा काय कराल?

हेच ना :
"मी नाही रोहिताश्व
मी खरंच
रोहिताश्व नाही."

पण तुम्ही त्या म्हाताऱ्याला
कसं
पटवून द्याल
की तुम्ही
रोहिताश्व नाहीत म्हणून?

तुमच्यावरची त्याची पकड
अधिकच घट्ट होईल
तो खडसावून सांगेल :
"तूच आहेस रोहिताश्व!"

ज्याचा रोहिताश्व
मारला गेला आहे
तुम्ही त्याला
विश्वासात घेऊन सांगू शकता का
की तुम्ही
रोहिताश्व नाहीत?

१९८४

## ५६. भिंतीवर नाव

जेव्हा मी किशोर होतो
जिथं कुठं सापडायची
कोरी करकरीत भिंत
मी लिहायचो
माझं स्वतःचं नाव

दुसऱ्या दिवशी दिसायचं
मिटवून टाकलेलं कुणीतरी
अशा तऱ्हेनं
जणू ते लिहिलेलंच नव्हतं

तेव्हा मी गर्जना करायचो
कुणी?
उत्तर मिळायचं—
सोमदत्तानं!

मी
आता म्हातारा झालोय्
जेव्हा जेव्हा दिसते
एखादी कोरी करकरीत भिंत
चुनखडीनं
लिहितो मी
माझं नाव
दुसऱ्या दिवशी दिसतं
मिटवून टाकलंय् कुणीतरी
अशा तऱ्हेनं
जणू लिहिलेलंच नव्हतं

आता जेव्हा मी गर्जना करतो
कुणी?
उत्तर मिळतं—
काळानं!

१९८४.

मगधनंतरच्या
असंकलित
कविता
(१९८४, '८५, '८६)

## १. गरुड

गरुडाबद्दल फक्त ऐकलं आहे
गिधाडाला पाहिलेलं आहे
जसा आहे
तसाच आहे

यावे गिधाडराज–
गरुडाची वाट पाहण्यात डोळ्यांच्या गारगोट्या झाल्यात.
गरुडाबद्दल फक्त तीनच लोकांना माहिती आहे
विष्णू, लक्ष्मी आणि व्यासाला
चौथा कुणीच नाही
(असल्यास सांगावं)

यावे गिधाडराज
गरुड पूर्वी कधी असला तरी तो पुन्हा अवतरणार नाही.

गरुड कधी नव्हताच
गिधाड होतं
ज्यांनी गिधाड पाहिलेलं नाही
त्यांच्याच स्वप्नांत
गरुड घिरट्या घालत असतो
घालू द्या खुशाल
गिधाडराज यावे–
गरुड कुणी पाहिला आहे?

१९८४

## २. पितामह

पितामह बाणांच्या शय्येवर पडले आहेत
कुणीच नाहीत. फक्त काही
उरले-सुरले उभे आहेत
जे विचारत आहेत,

पितामह कशासाठी अडले आहेत?
निर्णय झालेला आहे. पराजय झालेला आहे
आता तर व्यासांनी महाभारत लिहायला पण
सुरुवात केली आहे
आता कसल्या विचारात पडले आहेत?
व्यास, यांची समजूत काढा.

व्यासांनी कुठेही सांगितलेलं नाही
की हरल्यानंतरही पक्ष बदलू नये
पराजय स्वीकारा
कुशासनावर भीष्मासारखी
मृत्यूची प्रतीक्षा करा.

व्यासांनी कुठेही सांगितलेलं नाही
की युद्धात सत्य मारलं जात नाही
सांगितलंही असेल व्यासांनी, पण व्यासांना
असं म्हणायचं नव्हतं की
झालं असतं तर असंच झालं असतं

व्यासांनी कधी सांगितलं की
जो महाभारत लिहितो तो पक्षपाती असत नाही?

१९८४

## ३. जादूटोणा

माझ्यावर झडप घातली आहे मृत्यूनं
जबडयाखाली ठेवून खूप वेळ चघळणं चाललं होतं
प्रेक्षकांना वाटलं
गेला.

पण त्याच वेळी मृत्यूनं अकारणच
सोडून दिलं मला
सोडलं म्हणजे जबडयातून खाली पाडलं
प्रेक्षकांच्या करुणेची जागा निराशेनं घेतली
गर्दी ओसरू लागली–

मी म्हणालो
थांबा!
पण व्यर्थ!
मी ओरडलो,
ऐका!
पण व्यर्थ!
मी हाक दिली,
ऐकून तर घ्या!
पण व्यर्थ!
मी म्हणालो–

बंधूनो, ऐका! मी अजून
मेलो नाहीये
हे तेच आहे की मृत्यूच्या जबडयातून
सहीसलामत सुटलो
पण मेलो नाही.
तरीही व्यर्थच!

तेव्हा मी म्हणालो,
थांबा, अजून खेळ संपलेला नाही.
दाखवतो एक–
आणि पावलं थांबली.
आपले आणि परके
सगळेच वळले माझ्याकडे.

मी म्हणालो,
सगळ्यांनाच मरायचं आहे
हे ऐकताच गर्दी
माझ्यावर तुटून पडली.

मग कळलं,
मी मरावं म्हणूनच-मृत्यूनं,
सोडून दिलं होतं मला.

१९८४

# ४. मगधमधे स्मशानशांतता

अभिनंदन असो महाराज—कुणीच राहिलं नाही—
कुणालाच सोडलं नाही काळानं
श्रावस्तीची कूस वांझ झाली
कोसंबी विधवेसारखी
डोकं भादरून घेऊन
उभी आहे

कपिलवस्तु पांढऱ्याफटक
डोळयांनी
बघते आहे फक्त
अवंती
निवर्सन झाली आहे
काशीत प्रेतांचा हिशोब
चालला आहे
आणि मगधमधे?
मगधमधे स्मशानशांतता पसरली आहे.

क्षमा करा
महाराज
आपल्याला कळणार नाही
ही
स्मशानशांतता कशी आहे ते.

१९८५

## ५. गांधार

गांधारांमधे होऊन गेली एक
गांधारी
जिला दिसायचं सगळं काही
फक्त गांधारच दिसायचं नाही
जरी गांधार
हस्तिनापुराहून इतकं दूर नाही
की हस्तिनापूरात, जिथं
प्रत्येक गोष्टीची चर्चा व्हायची,
गांधाराची मात्र चर्चा नाही, चौकशी नाही की
व्यवहार नाही

खरं तर असं आहे की
सगळ्यांच्याच डोळ्यांत द्वेषाची आग होती
एकानं दुसऱ्याला पाहिलं
की दुसऱ्याचे डोळे भडकून उठत
दुसऱ्याचे नसले तर पहिल्याचे
सगळ्यांच्या डोळ्यांवर
कोळ्याचं जाळं होतं
खरं तर कुणीच
आंधळं नव्हतं
आणि हेही तेवढंच खरं होतं की
हस्तिनापुरही दिसत नव्हतं त्यांना

आणि कधी आलाच
प्रसंग गांधाराबाबत तरी
लोक खांदे उडवत
कुठं आहे गांधार?

तेव्हाही ते तसंच
वागत नव्हते का,
जसं ते वागले
स्वतःशी आणि
इतरांसोबत?

मित्रांनो,
हस्तिनापुरातील दोस्तांनो,
जर विचाराल,
कुठं आहे गांधार?
तर एक ना एक दिवस
मिळेलच उत्तर
हस्तिनापुरात

आज नाही, त्या दिवशी तरी
कळेलच तुम्हाला की गांधार कुठं आहे
जेव्हा हस्तिनापुराबाबतच
अनुभव येईल
की शोक करणं व्यर्थ आहे
कुणीही ऐकत नाहीत
हाकसुद्धा.

१९८५

## ६. काशीचे पंडित

काशीचे पंडित काशीचे पंडितच आहेत, अद्वितीय
बघा ना
चक्क धर्मयुद्धाची व्याख्याच करून टाकलीय् त्यांनी

आधीच केली असती तर, कशाला मारला गेला
असता दुर्योधन?
कशाला कर्ण?
मी विचारतोय् की, कशाला लिहिलं गेलं असतं
महाभारतच?

काहीही असो, कशीही असो
सरळच सांगून टाकतो की नगरवासियांनो,
देशवासियांनो–
मला अमान्य आहे
व्याख्याच धर्मयुद्धाची.

हे कसलं धर्मयुद्ध, निःशस्त्र लोकांवर जिथं
शस्त्र उगारलं जाणार नाही?
तर मग कुणावर उगारायचं शस्त्र?
निःशस्त्र लोकांवर उगारण्यासाठीच तर
निर्माण केली आहेत शस्त्रं!

१९८५

## ७. अश्वत्थामा

युद्ध झालं तरी मलाच मरावं लागणार आहे
नाही झालं तरी मलाच मरावं लागणार आहे
पूर्वीच्या काळी मला म्हणत असत अश्वत्थामा
आणि आता काय म्हणतील जेव्हा सगळंच बदलेलं
आहे—
अश्वत्थामा ट्रकखाली चिरडून मेला आहे!

१९८५

## ८. तक्षशिला

कुणी विरोध केला नाही
कुणी तक्रारही केली नाही
पानसुद्धा सळसळलं नाही
आम्मी
जाऊन मिळाला

ठीकच झालं
युद्ध टळलं
कुणी मारलं गेलं नाही
शोक ऐकावा लागला नाही
ब्राम्हणस्त्रिया हर्षित आहेत की ब्राम्हणांची
दक्षिणा कमी झाली नाही
वैश्य जे सुखी होते सुखी राहिले
क्षत्रियांना विचार करायला वेळ तरी कुठे होता?
जेव्हा गंगाधर अस्पृश्य राहिला नाही
फरक काय पडणार आहे
सुरक्षित आहे तक्षशिला
ठीकच तर झालं
पानसुद्धा सळसळलं नाही
आम्मी
जाऊन मिळाला.

१९८५

# १. आता मगध असणार नाही

(१ जानेवारी १९८६, बुधवार, नवी दिल्ली. 'मगध'नंतर दीड वर्षांनी आज वर्षाच्या पहिल्या दिवशी लिहिलेली माझ्या पुढच्या कवितासंग्रहाची भूमिका; जर यापुढे कविता लिहून झाल्या तर.)

जे पुढे निघून गेले आहेत
हसत आहेत,
मगध मागे राहिलं आहे.
जे मागे राहिले आहेत
धापा टाकत आहेत,
पुढे आहे, मगध
अजून पुढेच आहे.

मगध होऊन गेलं.
मगध व्हायचं आहे.
मगध नव्हतंच कधी.
मगध असेल कसं?

तर काय झालं?
हेही शक्य आहे
मगध होऊ लागलं आहे
आणि आपण आहोत बेखबर.

आणि हेही
शक्य आहे तर
की मगध विसरलं जावं

आणखी इतरही आहेत—
बघा तर अवंती
कशी सजलेली आहे.
आहे ना?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५४
काव्य
५५८२५
साखा (मराठी ग्रंथ)

आणि चंपा?
चंपाचं काय सांगावं?
तिची शानच और आहे
बघा बघा बघा
बघितलंत?
वैशाली!

मी म्हणालो होतो
फक्त अंबपाली आहे.
खरं नाही ते!

आणखीही आहेत.
विसरून जा.
कधी विचार केलायत् तुम्ही
रात्र आज तेवढीच गडद आहे
जेवढी काल होती.

मगधवर मगध, मगधवर मगध, मगधवर मगध—
चे थर जमा झाले आहेत
आता मगध असणार नाही
जे असेल
ते मगध नसेल

आठवत नाही,
काय सांगितलं होतं चंद्रगुप्तानं ते?
सगळं काही असेल, माझ्यानंतर
फक्त चंद्रगुप्तच
नसेल!

१ जाने. १९८६

## १०. शिव जे आठवतात आणि शिव जे आठवत नाहीत

मित्रांनों,
विसरू नका
शिव एकटेच आहेत
ज्यांच्यात
विष पिण्याची क्षमता आहे
आणि जे
पिलं जात आहे
ते आहे
विष.
तुम्ही पिलं आहे विष?
तर पिऊन बघा
तुम्हाला वाटेल
तुम्हीच आहात शिव
खरं तर
मित्रांनो,
विष पिऊनसुद्धा
सगळेच शिव होत नाहीत
आणि हेही की
विष पिल्याशिवाय
कुणीच
शिव बनत नाही.

१ जाने. १९८६

## ११. गंगा : आठवणीचा पर्याय

बंधूंनो
कवींनो आणि न-कवींनो
हे खरं नाही का
की तुमची आठवण गंगा होईल
किंवा मग
गटार होईल
कविता कविता होईल
न झाल्यास
शिवी होईल
काहीही असो
आठवणीला केंद्र करून
वाद घालणं सोडा
लक्षात ठेवा
वादसुद्धा तेवढ्यापुरताच
जेवढ्यापुरती
आठवण.
त्याच्या नंतर?
मणिकर्णिका.

१ जाने. १९८६

## १२. विदेह

तुम्हाला काय सांगितलं विदेहांनी,
जाणून घ्यायला उत्सुक आहे प्रजा
म्हणाले काय, विदेह?
बोलले की बोललेच नाहीत?
सांगा, सांगत का नाही??

विदेह ठीक तर आहेत ना? सुखी
तर आहेत? प्रसन्न आहेत ना?
की खिन्न आहेत? दु:खी आहेत?
आजारी आहेत?
जाणून घ्यायला आतुर झालीय् प्रजा
विदेह कसे आहेत?

जे आहेत त्यांच्याविषयीच्या
जे राहिले नाहीत त्यांच्याविषयीच्या
त्यांच्या मताला विशेष अर्थ आहे
सांगा ना, सांगत का नाही?

काय, काहीच म्हणाले नाहीत विदेह?
कुणाच्याच प्रकृतीची चौकशी केली नाही?
एवढं पण म्हणाले नाहीत
की सुखी राहो प्रजा?

तर ऐका
सत्य ऐकून घ्यायचं असेल
तर ऐका,
विदेह हे जग सोडून निघून गेले आहेत.

जाने. १९८६

## १३. अश्वघोष

बंधू अश्वघोष
मला कळला नाही अर्थ
ज्याच्या चेहऱ्यावर पाहिलं होतं मी हसू
त्यालाच
मुसमुसून रडताना बघतो आहे मी
ज्याला ऐकलं होतं मी गर्वानं
सांगताना
की अपार आहे सुख
तोच दिसतोय् आता
शोकविव्हळ होऊन
परतताना
मला कळला नाही याचा अर्थ.

ऐक बंधू,
मी अश्वघोष नाही
मी तोच आहे
ज्याच्या चेहऱ्यावर तू
हसू पाहिलं होतंस
आणि मग ज्याला रडताना पाहिलंस
जो गर्वानं सांगायचा
सुखी आहे मी
आणि मागाहून म्हणू लागला, ती फसवणूक होती
तोच आहे मी, आणि आता
मी अश्वघोष असतो
तरी काय झालं असतं?

इथल्या लोकांचं हेच वैशिष्टच आहे
ते पायऱ्या चढून जाताना
हसत असतात
खिदळत असतात
पायऱ्या उतरताना
अश्रू गाळत असतात
कधी स्वतःला
तर कधी पायऱ्यांना
शिव्या घालतात

इथल्या लोकांचं म्हणणं आहे की
हेच इथल्यांचं वैशिष्टच आहे
जन्माला येतात, खिदळतात
प्रेम करतात,
सोंगटया मांडतात
किती दुर्दैवी आहे हे, मित्रा
की जोपर्यंत ते लिप्त असतात
तोपर्यंतच चालतं हे सगळं
वेळ येताच
ते उचलतात सोंगटया
संशयानं बघतात
भयभीत होतात
'मी कोण आहे' हे विचारण्याऐवजी
येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकालाच
विचारत सुटतात, 'कोण आहेस तू? कोण?'
गडबडतात
धडपडतात
दरवाज्यावर खडखड करतात

आता तूच विचार कर, बंधू
मी जर नसतो अश्वघोष
तर विचारलं नसतं का मी तुला
की कोण आहेस तू?

जानेवारी १९८६

## १४ मणिकर्णिकेखाली मणिकर्णिकाच सापडेल

कण्हतो आहेस कशाला?
कुठलाही उपाय तुला मणिकर्णिकेपासून
वाचवू शकणार नाही.
विसरून जाण्याचा प्रयत्न का करतो आहेस?
कुठलीही विस्मृती
वास्तवावर पडदा टाकू शकत नाही.
कशाला फावडं घेऊन
मणिकर्णिका खोदतो आहेस? का
किंचाळत आहेस—
मी राहू देणार नाही
तुला,
मणिकर्णिके?
व्यर्थ आहे,
मित्रा,
व्यर्थ आहे!
मणिकर्णिकेच्या खाली
मणिकर्णिकाच
सापडेल
आणि त्याच्याही खाली
फक्त मणिकर्णिकाच!
आपण सगळे खोदतच आहोत.
तेव्हापासूनच शिकलोत आपण
फावडं
चालवणं
जेव्हा हे समजलं
की
प्रेत असतं,
आणि प्रत्येक वेळी
सापडली
मणिकर्णिकाच!

REFBK-0025625
REFBK-0025625

९ जाने. १९८६

## श्रीकांत वर्मा : परिचय

कवी, कथाकार, समीक्षक, पत्रकार, संपादक, सक्रिय राजनीतिज्ञ.

जन्मः १८ सप्टेंबर १९३१, विलासपूर, मध्यप्रदेश.

शालांत परीक्षा : म्युनिसिपल हायस्कूल, विलासपूर : १९४८. बी.ए.: आर्ट्स कॉलेज, विलासपूरः १९४८; एम्.ए. (हिंदी साहित्य): नागपूर विद्यापीठ : १९५६.

विवाह : १९६७; पत्नी : श्रीमती वीणा; पुत्र : अभिषेक.

'नई दिशा'चं संपादन (१९५५-५६); 'कृती'चं संपादन (१९५८-६१); सहाय्यक संपादक : भारतीय श्रमिक (१९५६-५८); उपसंपादक : दिनमान (१९६५-६६); विशेष प्रतिनिधी : दिनमान (१९६६-६७); संपादक : कॉंग्रेस न्यूजलेटर (१९८२-८४); संपादक : वर्णिका (१९८५-८६).

संसद-सदस्य (राज्यसभा) : १९७६ ते १९८२ व १९८२ ते १९८६; इंदिरा कॉंग्रेसच्या निवडणूक-प्रचार-यंत्रणेचे प्रमुख सूत्रधार : १९८० ते १९८५. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे सदस्य : १९८१ ते १९८६; कॉंग्रेस समितीचे सरचिटणीस : १९८५; अनेक साहित्यिक, सामाजिक, राजकीय संस्थांचे विश्वस्त, अध्यक्ष, सदस्य, मार्गदर्शक वगैरे.

१९७० ते १९८५ या काळात असंख्य वेळा २१ देशांचा प्रवास, प्रामुख्याने 'विजिटिंग पोएट' व कथाकार म्हणून. साहित्यासाठी राष्ट्रीय स्तराचे पुरस्कार ९ वेळा.

एकंदर चोवीस पुस्तकं. काही प्रमुख पुस्तकं खालीलप्रमाणेः—

कविता : भटका मेघ (१९५७), मायादर्पण (१९६७), दिनारंभ (१९६७), जलसाघर (१९७३), मगध (१९८४).

कथा : झाडी (१९६४), संवाद (१९६९), घर (१९८१), कादंबरी : दूसरी बार (१९६८).

समीक्षा : जिरह (१९७३). प्रवासवर्णन : अपोलो का रथ (१९७५)

मुलाखती आणि संवाद : बीसवी शताब्दी के अंधेरे में (१९८२).

अनुवाद : फैसले का दिन : आन्द्रे वोझनेसेन्स्की की कविताएँ (१९७०).

मृत्यू : २५ मे १९८६.